Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondry Education
S.R. No. 832 A, Final Plot No. 178, 179,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८ व१७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.: 020- 25705000 E-mail:- secretary.stateboard@gmail. Fax No.: 020-25665807

क्र.रा.मं/संशोधन/ ३१९५
पुणे – ४११ ००४
दिनांक- १८/०६/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय** :-कौशल्य सेतू अभियानमधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे बाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत.

**संदर्भ**:- १) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८ / प्र.क्र.१३५ / एसडी-२ दि. २७/०९/२०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना इ. १० वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्चा लाभ देण्यासाठी मंडळामार्फत कार्यवाही सुरू आहे.

कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना इयत्ता १०वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्चा लाभ घेता येतो ही बाब सर्व शाळांमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् बाबतच्या सूचना या पत्रासोबत देण्यात येत आहेत. या सूचना निकालासोबत आपल्या विभागीय मंडळाच्या अधिनस्त सर्व माध्यमिक शाळांना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर –४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/ 685
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-१९/०६/२०१९

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

राज्य मंडळाने जा.क्र. रा.मं./संशोधन/३१९५ दि. १८/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन कौशल्य सेतू अभियानामधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**कौशल्यसेतू मधील व्यवसाय विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस्चा लाभ घेण्यासाठी सूचना.**

**कौशल्यसेतू मधील व्यवसाय विषयाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे केलेल्या विद्यार्थ्यांना व्यवसाय विषयांचे क्रेडीटस् देण्याबाबत शासनसने दि.२७ सप्टेंबर,** २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

सदर **शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३५/एस.डी.२ दि.२७ सप्टेंबर, २०१८ नुसार -**

ज्या विद्यार्थ्यांनी कौशल्यसेतू अंतर्गत अभ्यासक्रम (एक कोर्स) पूर्ण केल्यास एका कोर्ससाठी त्यांना इ.१०वी च्या परीक्षेत दोन विषयासाठी दोनशे गुण प्राप्त करता येवू शकतील. तसेच याप्रमाणे दोन कौशल्यसेतू अभ्यासक्रम (दोन कोर्स) पूर्ण केल्यास ४०० गुण प्राप्त करता येवू शकतील. अशी तरतूद आहे. त्यासाठी पुढील प्रमाणे कार्यावाही करणे आवश्यक आहे.

१. विद्यार्थी ज्या माध्यमिक शाळेतून इ.१० वीच्या परीक्षेला प्रविष्ठ झाला होता. त्याच शाळेतून त्याने ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् मिळण्यासाठी अर्ज सादर करायचा आहे. फॉर्मसोबत इ.१० वीच्या गुणपत्रिकेची प्रत आणि कौशल्यसेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

२. विद्यार्थ्याला इ.१०वी परीक्षेत उत्तीर्ण होण्याकरिता/ ए.टी.के.टी. चा लाभ घेण्यासाठी आवश्यकतेनुसार किमान एक ते कमाल चार विषयांसाठी क्रेडिटस् / गुण वापरता येतील.

३. राज्य मंडळाच्या इ.१० वीच्या दोन भाषा आणि श्रेणी (ग्रेड) विषय उत्तीर्ण करणे कौशल्यसेतू मधील विद्यार्थ्यांना अनिवार्य राहील. तथापि हे विषय जर विद्यार्थ्याने कौशल्य सेतू अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापूर्वी इ.१० वी परीक्षेत उत्तीर्ण केले असतील तर त्याला पुन्हा त्या विषयांची परीक्षा द्यावी लागणार नाही. मात्र हे विषय त्यांनी यापूर्वी उत्तीर्ण केले नसतील तर ज्या शाळेतून विद्यार्थी इ.१० वीला प्रविष्ठ झाला होता त्या शाळेतून त्या विषयासाठी प्रविष्ठ व्हावे लागेल.

४. इ.१० वी ला कोणत्याही दोन भाषा विषयात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. ज्या भाषा विषयात उत्तीर्ण असेल त्या भाषेच्या माध्यमातूनच (पुढील इ.१० वी आर्टस्, कॉमर्स, सायन्स) शिक्षण घेता येईल.

५. ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस्चा लाभ मंडळाचे पुढील विषयांसाठीच घेता येईल. १. कोणताही एक भाषा विषय २. गणित ३. विज्ञान व तंत्रज्ञान ४. सामाजिक शास्त्रे

६. ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस्चे गुण दिल्यानंतर उत्तीर्ण होणाऱ्या / ए.टी.के.टी. साठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे गुणपत्रिका व प्रमाणपत्र देण्यांत येईल. इ.१० वीच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर Pass / A.T.K.T. with Transfer of Credits असे नमूद करण्यात यईल.

कृमाप

७. ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस्‌चे गुण घेवून विद्यार्थी इ.१०वी परीक्षा उत्तीर्ण झाला की पुन्हा मंडळाच्या दहावीच्या परीक्षेला प्रविष्ठ होता येणार नाही.

८. असा विद्यार्थी इ.११ वी साठी कोणत्याही शाखेत प्रवेश घेण्यास पात्र राहील. मात्र मंडळाच्या नियमानुसार इ.११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी इ.१० परीक्षेत विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयात किमान ३५ टक्के गुण त्याला प्राप्त होणे आवश्यक असेल.

९. गणित विषयासाठी ट्रान्सफर ऑफ क्रेडीटस्‌चे गुण घेवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला इ.११ वी मध्ये विज्ञान व वाणिज्य शाखेत गणित विषय घेता येणार नाही.

सन २०१८-१९ पूर्वी कौशल्यसेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या २४२ विद्यार्थ्यांनी मंडळाकडे अर्ज केले होते. त्यापैकी १४९ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/685
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-१९/०६/२०१९

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

राज्य मंडळाने जा.क्र. रा.मं./संशोधन/३१९५ दि. १८/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन कौशल्य सेतू अभियानामधील व्यवसाय अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.